This ad has been published in LOKSATTA-MUMBAI
on 09th July, 2025

हिंदुस्तान युनिलीव्हर लिमिटेड
(CIN: L15140MH1933PLC002030)

क्वालिटी वॉल्स (इंडिया) लिमिटेड
(CIN: U10505MH2025PLC437886)

**नोंदणीकृत कार्यालय:** युनिलीव्हर हाऊस, बी.डी.सावंत मार्ग, चकाला, अंधेरी (पू.), मुंबई – ४०० ०९९.
**फोन:** +९१ २२ ५०४३२७९१/५०४३२७९२ **ईमेल:** levercare.shareholder@unilever.com, **वेबसाईट:** www.hul.co.in

**फॉर्म नं.सीएए२**

**(कंपनी कायदा, २०१३ चे कलम २३०(३) आणि कंपनीज् (कॉम्पमाईजेस, अरेंजमेंट्स अँड ॲमलगमेशन / तडजोड, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम,२०१६ चे) नियम ६ आणि ७ अन्वये**

**नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्यूनल (राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण), मुंबई बेंच, कोर्ट १ समोर**

**कंपनी स्कीम ॲप्लीकेशन नं. सीए (सीएए) १४२/एमबी/२०२५**

कंपनी कायदा, २०१३ प्रकरणी;

आणि

कंपनी कायदा २०१३ ची कलमे २३०–२३२ आणि कंपनीज् (कॉम्पमाईजेस, अरेंजमेंट्स अँड ॲमलगमेशन / तडजोड, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम,२०१६ सोबत वाचले असता, कंपनी कायदा २०१३ मधील अन्य तत्संबंधी तरतुदीच्या प्रकरणी;

आणि

कंपनी कायदा, २०१३ ची कलमे २३०–२३२ आणि अन्य लागू तरतुदींअन्वये हिंदुस्तान युनिलीव्हर लिमिटेड आणि क्वालिटी वॉल्स (इंडिया) लिमिटेडचे संबंधित शेअरधारक यांतील व्यवस्थायोजनेच्या प्रकरणी

हिंदुस्तान युनिलीव्हर लिमिटेड (CIN: L15140MH1933PLC002030), कंपनी कायदा १९१३ मधील तरतुदींनुसार स्थपन करण्यात आलेली एक कंपनी जि चे नोंदणीकृत कार्यालय युनिलीव्हर हाऊस, बी.डी. सावंत मार्ग, चकाला, अंधेरी (पू.), मुंबई – ४०० ०९९ येथे आहे. ... अर्जदार कंपनी १/ डीमर्ज झालेली (विभाजित कंपनी)

क्वालिटी वॉल्स (इंडिया) लिमिटेड (CIN: U10505MH2025PLC437886), कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदींनुसार स्थपन करण्यात आलेली एक कंपनी जि चे नोंदणीकृत कार्यालय युनिलीव्हर हाऊस, बी.डी. सावंत मार्ग, चकाला, आंतराष्ट्रीय विमानतळ, अंधेरी (पू.), मुंबई – ४०० ०९९ येथे आहे. ... अर्जदार कंपनी २/ नवीन (उद्भवलेली) कंपनी

**नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्यूनल (राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण), मुंबई बेंच यांच्या निर्देशानुसार सभासदांच्या बैठकीसाठी दिली गेलेली सूचना आणि जाहिरात**

याद्वारे सूचित करण्यात येते की, दिनांक ११ जून २०२५ रोजी पोहोचवलेल्या आदेशानुसार, माननीय नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्यूनल (राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण), मुंबई बेंच **(''ट्रायब्यूनल'')** यांनी, अन्य बाबींबरोबरच, निर्देश दिले आहेत की, हिंदुस्तान युनिलीव्हर लिमिटेड **(''अर्जदार कंपनी १'')**च्या शेअरधारकांची बैठक आयोजित आणि संचालित करण्यात यावी, ज्याचा उद्देश कंपनी कायदा २०१३ची कलमे २३० ते २३२ अन्वये आणि कायद्यातील अन्य तरतुदींअन्वये **(''योजना'')** आणि त्याअंतर्गत असलेले नियम (संवैधानिक दुरुस्ती आणि पुनर्रचना ज्या वेळोवेळी अमलात असतील) आणि सेबीचे प्रमुख परिपत्रक क्र.सेबी/एचओ/सीएफडी/पीओडी–२/पी/सीआयआर/२०२३/९३, दिनांक २० जून २०२३, त्यातली वेळोवेळी केलेल्या सुधारणांसह आणि सेबीद्वारे जारी केलेल्या, व्यवस्थेच्या योजनेसंबधी परिपत्रकांनुसार, हिंदुस्तान युनिलीव्हर लिमिटेड आणि क्वालिटी वॉल्स (इंडिया) लिमिटेड यादरम्यानच्या व्यवस्था योजनेबाबत त्यांच्यासंबधित शेअरधारकांसोबत विचारविनिमय करणे आणि जर योग्य असले तर, दुरुस्तीसह किंवा दुरुस्तीविना मंजूर करणे हा असेल.

माननीय न्यायाधिकरणाने याचबरोबर असेही निर्देश दिले आहेत की: (i) अर्जदार कंपनी १चे सुरक्षित कर्जदार आणि असुरक्षित कर्जदार यांची स्वतंत्र बैठक आयोजित आणि संचालित करणे रद्द करण्यात आलेले आहे; आणि (ii) योजना मंजूर करण्यासाठी, अर्जदार कंपनी २ चे इक्विटी शेअरधारक, सुरक्षित कर्जदार आणि असुरक्षित कर्जदार यांची स्वतंत्र बैठक आयोजित करणे रद्द करण्यात आले आहे किंवा त्याची आवश्यकता नाही, ज्याची कारणे आदेशामध्ये नमूद केलेली आहेत.

माननीय न्यायाधिकरणाचा आदेश आणि त्यातील दिलेल्या निर्देशांनुसार, पुढील सूचना दिली जात आहे की, अर्जदार कंपनी क्र.१ च्या इक्विटी शेअरधारकांची सभा **मंगळवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ११:०० वाजता** सभासदांच्या एका ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग किंवा अन्य ऑडिओ–व्हिज्युअल माध्यमाद्वारे **(''व्हीसी/ओएव्हीएम'')** आयोजित केली जाईल जी, त्यानंतर वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रकांसोबत, ज्यातील सर्वात अलीकडचे परिपत्रक सर्वसाधारण परिपत्रक क्र.०९/२०२४ दिनांक १९ सप्टेंबर २०२४, (एमसीए परिपत्रके), वेळोवेळी केलेल्या सुधारणांसह आणि कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालय, भारत सरकारद्वारे यासंबंधी वेळोवेळी जारी केलेल्या अन्य परिपत्रकांसह वाचले असता, कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालय (एमसीए) सर्वसाधारण परिपत्रक क्र.१४/२०२०, दिनांक ८ एप्रिल २०२० मध्ये नमूद केलेल्या संचालन प्रक्रियेला अनुसरून आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज् ऑफ इंडियाद्वारे जारी केलेल्या सर्वसाधारण सभांच्या सेक्रेटरियल स्टँडर्ड परिपत्रकाला अनुसरून आयोजित केली जात आहे.

अर्जदार कंपनी १ ने, कायद्याचे कलम १०२ सह वाचले असता कायद्याचे कलम २३० आणि २३२ आणि कायद्यातील अन्य तरतुदींअन्वये आणि कंपनीज् (कंपनीज अरेंजमेंट्स अँड ॲमलगमेशन्स) नियम, २०१६चा नियम ६ अन्वये **(''सूचना'')**, वरील सभेची सूचना, योजना आणि स्पष्टीकरण देणारे निवेदन, दिनांक ७ जुलै २०२५ रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अशा शेअरधारकांना पाठवली आहे ज्यांचा ईमेल पत्ता कट–ऑफ दिनांकाला म्हणजेच २३ जून २०२५ **(''डिस्पॅच कट–ऑफ दिनांक'')** रोजी अर्जदार कंपनी १/रजिस्ट्रार ॲंड शेअर ट्रान्स्फर एजंट किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपीज्)यांच्याकडे नोंदवलेला आहे. हेच दस्तावेज अर्जदार कंपनीच्या वेबसाईटवर www.hul.co.in, स्टॉक एक्सचेंजच्या म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या वेबसाईटवर www.bseindia.com, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाईटवर www.nseindia.com आणि एनएसडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर उपलब्ध आहेत. जे सदस्य विनंती करतील त्यांना या सूचनेच्या प्रती पाठवल्या जातील. याचबरोबर अर्जदार कंपनी ज्या सदस्यांचे ईमेल पत्ते अर्जदार कंपनी १ / रजिस्ट्रार / डीपी यांचेकडे नोंदवले नाहीत अशा सभासदांना ही सूचना पाहता यावी यासाठी अर्जदार कंपनी १ ची वेबलिंक पाठवेल.

अर्जदार कंपनी १चे उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र इक्विटी शेअरधारक सभेपूर्वी पुरवण्यात आलेल्या रिमोट ई–व्होटिंगच्या माध्यमातून किंवा सभेदरम्यान उपलब्ध करून देण्यात आलेल्या ई–व्होटिंगच्या माध्यमातून मतदान करू शकतात. सभा व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून आयोजित केली जात असल्याने सभेसाठी प्रतिनिधी (प्रॉक्सी) नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध असणार नाही. कॉर्पोरेट बॉडीला परवानगी असेल तर, मतदान करता येईल जर कंपनीज् (कंपनीज्, अरेंजमेंट्स अँड ॲमलगमेशन) नियम, २०१६चा नियम १० नुसार आवश्यक, वरील सभा सुरु होण्यापूर्वी किमान ४८ तास आधी अर्जदार कंपनी १ कडे levercare.shareholder@unilever.com वर विहित फॉर्म/प्राधिकृतीकरण ज्याची एक प्रत guptaashwin761@gmail.com यांना पाठवली असेल तरच शक्य आहे.

ई–व्होटिंगसाठी महत्त्वाच्या तारखा खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| रिमोट ई–व्होटिंग सुरुवात होण्याची तारीख | गुरुवार, ७ ऑगस्ट २०२५ भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ९:०० |
| रिमोट ई–व्होटिंग समाप्तीची तारीख | सोमवार, ११ ऑगस्ट २०२५ भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५:०० |
| सभेमध्ये ई–व्होटिंग | मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५ (मतदानाची घोषणा सभेच्या अध्यक्षांद्वारे केली जाईल.) |

वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित मतदान कालावधी संपल्यानंतर रिमोट ई–व्होटिंग आणि ई–व्होटिंग करता येणार नाही. शेअरधारकांना सभेमध्ये फक्त एकाच माध्यमातून म्हणजेच रिमोट ई–व्होटिंग किंवा ई–व्होटिंगद्वारे मतदान करता येईल. रिमोट ई–व्होटिंगच्या माध्यमातून मतदान करणाऱ्या सभासदांना सभेसाठी उपस्थित राहता येईल परंतु पुन्हा मतदान करता येणार नाही.

कट–ऑफ दिनांक, म्हणजेच **मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी (''कट–ऑफ दिनांक'')**, ज्यांचे नाव रजिस्टर ऑफ मेंबर्स किंवा डिपॉझिटरी द्वारे ठेवलेल्या रजिस्टर ऑफ बेनिफिशियरी मेंबर्समध्ये नोंदवलेले असेल त्यांनाच सूचनेमध्ये नमूद केलेल्या प्रस्तावित ठरावावर त्याचे / तिचे/आपले मतदान (रिमोट ई–व्होटिंग किंवा सभेमध्ये उपलब्ध करून दिलेल्या ई–व्होटिंग सुविधांपैकी एकाच माध्यमातून) करता येईल. कट–ऑफ दिनांकाला जे अर्जदार कंपनी १ चे इक्विटी शेअरधारक नसतील अशा व्यक्तींनी सदर सूचना फक्त माहितीसाठी आहे असे समजावे.

कट–ऑफ दिनांकाला प्रेषण झाल्यानंतर ज्या कोणीही व्यक्तीने अर्जदार कंपनी १ चे शेअर घेतले असतील आणि ज्यांचे नाव रजिस्टर ऑफ मेंबर्स किंवा डिपाझिटरी द्वारे ठेवलेल्या रजिस्टर ऑफ बेनिफिशियरी मेंबर्समध्ये कट–ऑफ दिनांकाला दिसत असेल, ते सूचनेमध्ये दर्शवल्याप्रमाणे सदर सूचना अर्जदार कंपनीची वेबसाईट https://www.hul.co.in/investors/corporate-governance/demerger-of-ice-cream-business/ वरून डाऊनलोड करून लॉगइन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतात.

अर्जदार कंपनी १ यांनी रिमोट ई–व्होटिंग आणि व्हीसी / ओएव्हीएम द्वारे आयोजित सभेदरम्यान ई–व्होटिंग सुविधा पुरवण्याठी नॅशनल सिक्युरिटीज् डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) ची नियुक्ती केली आहे. व्हीसी/ओएव्हीएम द्वारे सभेला उपस्थित राहणे किंवा रिमोट ई–व्होटिंग सुविधा आणि सभेद्वारे ई–व्होटिंग सुविधा वापरणे यामध्ये काही अडचण येत असल्यास आपण **सुश्री. पल्लवी म्हात्रे, सिनियर मॅनेजर, एनएसडीएल, यांच्याशी निर्देशित ईमेल आयडी evoting@nsdl.com वर संपर्क साधू शकता.**

सभेच्या सूचनेची प्रत सभेच्या दिनांकापर्यंत कंपनी १ च्या नोंदणीकृत कार्यालयामधून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेमध्ये म्हणजेच भारतीय प्रमाणवेळेनुसार, सकाळी ९:०० वाजल्यापासून सायंकळी ५:०० वाजेपर्यंत विनामूल्य मिळवता येईल. किंवा, कंपनीचा ईमेल आयडी Levercare.shareholder@unilever.com वर लेखी कळवून सूचनेची इलेक्ट्रॉनिक/सॉफ्ट कॉपी मिळवता येईल.

झाल्यास, सभेच्या स्थगितीसह सभेचे अध्यक्ष म्हणून माननीय न्यायाधिकरण यांनी श्री.फर्डिनो रेबेलो (निवृत्त सरन्यायाधीश, अलाहाबाद उच्च न्यायालय) यांची नियुक्ती केली आहे. तसेच माननीय न्यायाधिकरण यांनी श्री.अश्विनी रमाकांत गुप्ता, कंपनी सेक्रेटरी (सीओपी १८१६३) यांची झाल्यास, सभेच्या स्थगितीसह, सभेचे स्क्रूटिनायझर म्हणून नियुक्ती केली आहे.

योजना, जर माननीय न्यायाधिकरणाद्वारे आयोजित सभेमध्ये मंजूर झाली तर, त्यानंतरच्या माननीय न्यायाधिकरण आणि अन्य तशाच प्रकारच्या मंजूरी आणि नियामक किंवा अन्य अधिकाऱ्यांच्या परवानग्या व मंजूरी, ज्यांची आवश्यकता या योजनेमध्ये विचारात घेतली गेली असेल यावर अवलंबून असेल.

त्याअनुषंगाने अर्जदार कंपनी १ च्या इक्विटी शेअरधारकांना वर नमूद केलेल्या माध्यम, दिनांक व वेळेनुसार सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येते. कायद्याचे कलम १०३ अन्वये गणसंख्या ठरवण्यासाठी व्हीसी/ओएव्हीएम द्वारे सभेस उपस्थित राहणाऱ्या अर्जदार कंपनी १च्या इक्विटी शेअरधारकांची उपस्थिती नोंदवण्यात येईल. सभेच्या सुरुवातीला जर उपरोक्त गणसंख्या हजर नसेल तर सभा ३० मिनिटांसाठी तहकूब केली जाईल.

मात्र त्यानंतर अर्जदार कंपनी १ चे जे शेअरधारक सभेस उपस्थित असतील ती गणसंख्या म्हणून गृहित धरण्यात येईल. सभेमध्ये झालेल्या मतदानाचा निकाल, सभेच्या अध्यक्षांद्वारे किंवा त्यांचेद्वारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे, तसेच स्क्रूटिनायझरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सभा संपल्यापासून २ (दोन)आठवड्यांमध्ये जाहीर करण्यात येईल आणि तो अर्जदार कंपनीची वेबसाईट https://www.hul.co.in/investors/corporate-governance/demerger-of-ice-cream-business वर आणि एनएसडीएलची https://www.evoting.nsdl.com वेबसाईट वर सभा संपल्यानंतर २ (दोन) आठवड्यांच्या आत डिस्प्ले केला जाईल.

श्री.फर्डिनो रेबेलो,
निवृत्त सरन्यायाधीश, अलाहाबाद उच्च न्यायालय,
सभेसाठी नियुक्त अध्यक्ष

दिनांक ९ जुलै, २०२५
स्थान: मुंबई